कौतुक फार केले  (गजल)

माझ्या कलेवराचे कौतुक फार केले
होतो जिवंत तेव्हा त्यांनीच ठार केले ।१

असतो समोर जेव्हा ते गोड बोलती पण
वळताच पाठ माझी पाठीत वार केले ।२

कळते मला तरिही मी हिंस्त्र होत जातो
मोहून प्रेम त्यावर त्यांनी अपार केले ।३

पाऊस बरसतो पण सुकतात वृक्ष येथे ?
उन्हास तळपत्या या त्यांनीच गार केले ।४

नसते विशेष काही त्यांच्या जगात सागर
खोटेच हे देखावे त्यांनी तयार केले ।५

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, (९०११०८२२९९)

थोरले भाट, ताळगाव गोवा
४०३००२